# ई - पोलीस पत्रिका

*दि ०२/१२/२०२१* *अनु.क्र. २१७*

# (अमरावती शहर पोलीसांची २०२१ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

## भाग-१
## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/ रजा
## नेमणुक

**१.जा.क्र.पोआअ/आस्था-१/सपोउपनि-प्रधान नेमणुक/१०९९४/२०२१   अमरावती दि. ०२.१२.२०२१**

**आदेश**

सहायक पोलीस उपनिरीक्षक.१६७७, हरीश देविदास प्रधान यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांची पोलीस मुख्यालय येथून शहर वाहतुक शाखा पश्चिम येथे नेमणुक करण्यांत येत आहे. सदर पोलीस अमंलदार यांना त्यांचे नेमणुकीचे ठिकाण हजर होणेकरीता तात्काळ रवाना करण्यांत यावे व त्याबाबतचा पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा

## रजा

**२.जा.क्र.पोआअ/पशा-१/पोअधि-रुग्णनिवेदन कालावधी/१०९८०/२०२१  अम. दि. ०२.१२.२०२१**

**आदेश**

खालील नमुद पोलीस अधिकारी यांचा त्यांचे नावासमोर दर्शविण्यांत आलेला रुग्णनिवेदन कालावधी त्यांनी सादर केलेल्या वैदयकीय प्रमाणपत्र तसेच शिल्लक रजा चे अनुषंगाने मंजुर (परिवर्तीत /विनावेतन / रुग्णालयीन) करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अधिकारी यांचे नाव | सध्याचे नेमणुकीचे ठिकाण | रुग्णनिवेदन कालावधी | दिवस | मंजुर करण्यांत आलेली रजा |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोनि. पंजाब वंजारी | बडनेरा | दि. २०.१०.२०२० ते दि. २७.१०.२०२१ | ०९ | परिवर्तीत रजा |
| ०२ | सपोनि. पुजा खांडेकर | गा.नगर | दि. १५.०६.२०२१ ते दि. ०८.०८.२०२१ | ५५ | परिवर्तीत रजा |
| | | | दि. ०९.०८.२०२१ ते दि. १७.०८.२०२१ | ०९ | अर्जित रजा |

**३.जा.क्र. पोआअ/पशा-१/रजा पोलीस अधिकारी/१०९८०/२०२१  अमरावती दि. ०२.१२.२०२१**

**आदेश**

श्री. विक्रम साळी, पोलीस उप आयुक्त, (परिमंडळ-२) अमरावती शहर यांना दि. ०८.१२.२०२१ ते दि. १४.१२.२०२१ पर्यंत ०७ दिवस अर्जित रजा मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजुर करण्यांत येत आहे.

तसेच अर्जित रजा मंजुरीच्या कालावधीमध्ये श्री. विक्रम साळी, पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-२) अमरावती शहर यांना शासन परिपत्रक दि. २१.१२.२०१४ मधील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करतील या अटीवर खाजगी कारणास्तव विदेश यात्रा दुबई येथे जाणेस परवानगी देण्यांत येत आहे.

श्री. विक्रम साळी, पोलीस उप आयुक्त, (परिमंडळ-२) अमरावती शहर यांना मंजुर करण्यांत आलेल्या उपरोक्त अर्जित रजेच्या कालावधीमध्ये त्यांचे कडील परिमडळ-२ या पदाचा अतिरीक्त कार्यभार श्री. एम.एम.मकानदार, पोलीस उपायुक्त, परिमंडळ-१ यांचेकडे सोपविण्यांत येत आहे.

**४.जा.क्र.पोआअ/पशा-१/रजा पोलीस अधिकारी/१०९७९/२०२१ अमरावती दि. ०२.१२.२०२१**

**आदेश**

खालील नमुद अधिकारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधीत किरकोळ रजा मंजुर करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अधिकारी यांचे नाव व पदनाम | नेमणुकीचे ठिकाण | रजेचा प्रकार | कालावधी | कार्यभार सांभाळणार |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सपोनि. रितेश राऊत | डायल-११२ | किरकोळ रजा | दि. ०१.१२.२०२१ ते दि.०४.१२.२०२१ पर्यंत ४ दिवस | सपोनि. अविनाश इंगळे, नि.कक्ष |
| ०२ | पोउपनि. राजेंद्र शेडे | आ.गु.शा. | किरकोळ रजा | दि. ०२.१२.२०२१ ते दि.०४.१२.२०२१ पर्यंत ३ दिवस | |
| ०३ | पोउपनि. संजय नागझिरकर | शवशा प | किरकोळ रजा | दि. ०७.१२.२०२१ ते दि.०९.१२.२०२१ पर्यंत ३ दिवस | |

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त /मयत

### शिक्षा

**१.जा.क्र.पोआअ/विचौ-२/कसुरी/अंतिम आदेश/सपोउपनि प्र.यं.तिवारी/१०९६४/२१ दि. ०१.१२.२०२१**

**आदेश**

**कसुरदाराचे नावः-** सपोउपनि. प्रमुख यंत्रचालक अजय सत्यनारायण तिवारी, नेमणुक बिनतारी संदेश विभाग, अमरावती शहर

**थोडक्यात कसुर :-**

सपोउपनि. प्रमुख यंत्रचालक अजय सत्यनारायण तिवारी, बिनतारी संदेश विभाग, अमरावती शहर नेमणुकीस असुन तात्कालीन नेमणुक पोलीस अधिक्षक अमरावती ग्रमीण यांचे आस्थापनेवर असतांना पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा येथे दि. ११.०८.२०२१ रोजी फिर्यादी यांचे तक्रारीवरुन आरोपी अजय सत्यनारायण तिवारी, ऑपरेटर बिनतारी संदेश विभाग,अमरावती ग्रामीण यांचे विरुध्दर पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा येथे अप क्र. १५७२/२०२१ कलम ३२४,५०४,५०६,३४ भादवि चा गुन्हा नोंदविण्यांत आहे आहे. हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी व आरोपी हे शेजारी राहत असुन त्यांच्यात मागील सहा महीण्यापासुन सरकारी नालीचे

कारणास्तव वाद सुरु आहे. नमुद घटना तारीख, वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्र. १ अजय सत्यनारायण तिवारी यांनी नाली बुजविण्यांकरीता रायटर टाकत फिर्यादी यांनी आपणास म्हटले की तुम्ही नालीवर रायटर का टाकत आहे या वरुन फिर्यादी शिवीगाळ करुन घरातील लोखंडी पाईप आणुन फिर्यादीचे डोक्यावर मारले तसेच फिर्यादीचा मुलगा सोडवण्याकरीता आला असता आरोपी क्र. २ अंकुश अजय तिवारी यांने सुध्दा मारहान करुन शिवीगाळ केली अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट व ममेडी सटी वरुन सदरचा गुन्हा नोंदविण्यांत आला आहे.

अशा प्रकारे आपण शिस्तबध्द पोलीस खात्यात नेमणुकीस असुन सुध्दा आपल्या कर्तव्याप्रती बेशिस्तपणा केल्ययाचे निदर्शनास आले आहे. खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यांत येत आहे.

**अंतिम आदेश**

**उपरोक्त नमुद कसुरदार यांना देय वार्षीक वेतनवाढ एक (१) वर्षाकरीता (परिणाम न होता) रोखण्याची शिक्षा देण्यांत येत आहे.**

**२.क्र.पोआअ/विचौ-१/निलंबन/एसीबी/पोहवा.११६२ रामदास जोंधळे/१०८८०/२०२१ दि. ३०.११.२०२१**

**निलंबन ओश**

पोहवा. रामदास जोंधळे / ११६२, नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शरह येथे नेमणुकीस असुन तुमची पो.स्टे. फ्रेजपुरा चार्ली-१ वर पेट्रोलिंग डयुटी दरम्यान तक्रारदार यांचे कडुन मालवाहु रेतीचा ट्रक विना त्रास चालवू देण्याकरीता २०००/- रुलाचेची मागएरहकरीत आहे. अशो तक्रारीवरुन दि. २८.०८.२०२१ रोजी पडताळणी कार्यवाही क्र.२ ि . ०१.०९.२०२१ व दि. ०२.०९.२०२१ रोजी सापळा कार्यवाही आयोजीत करण्यांत आली व या दरम्यान पोहवा. ११६२ जोंधळे यांनी तक्रारदार यांचेकडुन २०००/- रुलाच स्विकारणे करीता संपर्क करुन लाच स्विकारणे करीता संपर्क करुन लाच स्विकारण्याचा प्रयत्न केली.

तुमच्या उपरोक्त कर्तव्यावरील गंभीर गैरवर्तनाचे कृत्यामुळे तरतुदीनुसार अटक झाल्याचे **दिनांक ३०.११.२०२१ पासुन शासन सेवेतुन निलंबित करण्यांत येत आहे.**

**वेतन / वेतन संरचना / वेतन निश्चिती/वार्षिक वेतनवाढ/ संकीर्ण**

**निरंक**

. .

**( लक्ष्मण डुंबरे )**
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
पोलीस आयुक्त,अमरावती शहर, करिता

प्रत, पत्रव्यवहार शाखा/ सेवापट नोंदणी लिपीक, आस्थापना शाखा/ सीसीटीएनएस कक्ष यांना माहीती करीता .